**L. A. BILL No. XXVII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.

**मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

२०२१ चा महा. अध्या.११. **आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), कलम १५४ मध्ये, पोट-कलम (१ड) मधील, खंड (अ) मध्ये, — १८८८ चा ३.

(एक) उप-खंड (एक) मधील, "२०२०-२१ या वर्षी" या मजकुरानंतर "व २०२१-२२ या वर्षी" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (दोन) मधील, "२०२०-२०२१" या मजकुरानंतर "व २०२१-२०२२" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) उप-खंड (तीन) मधील,—

(अ) "२०२१-२०२२ या वर्षी" या मजकुराऐवजी "२०२२-२०२३ या वर्षी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) "२०२०-२०२१ या वर्षी" या मजकुरानंतर "व २०२१-२०२२ या वर्षी" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**३.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

२०२१ चा महा. अध्या. ११.

**४.** (१) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी १८६९-३ (५००—१२-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगरविकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.